ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. P. 534. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २१ मार्च, १९५९ | अंक ११

## विविध माहिती

**कलकत्त्यामधील धुराचा त्रास**— कलकत्त्यामधील दर चौरस मैलावर दरमहा ६० टन, वजनाचा धूळ व धूर ह्यांनीं मिश्रित असा थर बसतो, अशी माहिती बंगालचे मुख्य मंत्री डॉ. बी. सी. रॉय ह्यांनीं सांगितली. शहरांत लोक राहण्याच्या भागांतच गॅस तयार करण्यांत येत असल्यामुळें कारखान्यांच्या चिमण्यांमधून सारखा धूर ओकला जातो. दुर्गापूर कारखाना सुरू झाल्यावर तेथील गॅस वापरण्यांत येऊन हा त्रास कमी होईल अशी अपेक्षा आहे.

**खंडसारी साखरेचे कारखाने**— उत्तर प्रदेश गूळ व खंडसारी असोसिएशननें खंडसारी साखरेची निर्मिति थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. अंदाजपत्रकांत बसविण्यांत आलेला कर भरणें शक्य नाहीं, असें संघटनेचें मत आहे. उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत औद्योगिक शक्तीचा वापर करून खंडसारी साखर तयार करणारे १,००० कारखाने आहेत.

**कांडला येथील नवा विमानतळ**—कांडला येथें बांधण्यांत आलेल्या नव्या विमानतळाचें उद्घाटन करण्यांत आलें. विमानतळ बांधण्यासाठी १६ लाख रुपये खर्च आला. तळावर सर्व प्रकारच्या आधुनिक सोयी करण्यांत आलेल्या आहेत. पुढील पांच वर्षांत हवाई वहातुकींतील संभाव्य घडामोडी लक्षांत ठेवून तळाची उभारणी करण्यांत आली आहे.

**उत्पादनतंत्राचा अभ्यास**—कापडगिरण्यांतील उत्पादन-तंत्राचा अभ्यास करण्यासाठी भारतामधील एक मंडळ परदेशांच्या दौऱ्यावर जाणार आहे. मंडळावर गिरणीमालक, कामगार आणि सरकार ह्यांचे प्रतिनिधी असतील. जपान, अमेरिका व स्विट्झरलंड ह्या देशांतील गिरण्यांची पहाणी करून मंडळ सरकारला अहवाल सादर करील.

**पोरबंदरमध्यें नवीन कॉलेजें**—जून, १९५९ पासून पोरबंदर येथें एक आर्टस व एक कॉमर्स कॉलेज सुरू करण्यांत येणार आहे. दोन्ही कॉलेजें नवयुग एज्युकेशन सोसायटीतर्फे चालविण्यांत येणार आहेत. ह्या नव्या कॉलेजांमुळें स्थानिक ४०० विद्यार्थ्यांची चांगली सोय होईल व इतर कॉलेजांवरील ताणाहि कमी होईल.

**शरीरव्यापार दर्शविणारी कांचेची गाय**— पूर्व जर्मनी-मधील ड्रेसडन येथील वैद्यकीय वस्तुसंग्रहालयांत कांचेची गाय ठेवण्यांत येणार आहे. अंतरंगांत प्रकाशाची योजना करून गाईच्या शरीराचे व्यापार दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्यापूर्वीं ह्याच वैद्यकीय संस्थेनें अशा प्रकारची घोड्याची व माणसाची प्रतिकृति तयार केलेली आहे. कांचेचा माणूस परदेशांत निर्यातहि करण्यांत आला आहे.

**मोठा मोती सांपडला**—तुतिकोरीनजवळच्या समुद्र-किनाऱ्यालगत मोती काढण्याचें काम चालूं झालें आहे. ह्या हंगामांत ४॥ कॅरेट वजनाचा मोती असलेला एक शिंपला सांपडला आहे. मोत्याचा लिलांव करण्यांत आला असता ७५० रु. किंमत आली. मोत्याच्या बाजारांत त्याला १,००० रुपयांच्यावर किंमत येईल अशी अपेक्षा आहे.

**मोटार-वाहतुकीवर रेल्वेचा खर्च**—येत्या आर्थिक वर्षांत रस्त्यावरून चालणाऱ्या मोटार वहातुकीवर रेल्वेतर्फे ५० लाख रु. निरनिराळ्या राज्यांत खर्च करण्यांत येणार आहेत. रेल्वेच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. आंध्र, म्हैसूर व बिहार राज्यांच्या रस्ता-वहातूक कॉर्पोरेशनमध्यें रकमा गुंतविण्यांत येणार आहेत.

**अमेरिकेकडून मिळणारी मदत**—भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान करण्यांत आलेल्या कराराप्रमाणें अमेरिका भारताला १०० कोटी रुपये मदत म्हणून देणार आहे. त्यापैकी ९० कोटी रुपये कर्जाऊ म्हणून आहेत. कर्जाची रक्कम ४० वर्षांत परत करावयाची आहे. ह्यापैकी बहुतेक रक्कम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील जलविद्युत् कार्यक्रमावर खर्च केली जाईल.

**फुटलेल्या धरणाची बांधणी**— गेल्या वर्षीं ऑगस्ट महिन्यांत आंध्र राज्यांतील अदिलाबाद जिल्ह्यांतील कदम धरण अतिवृष्टीमुळें फुटलें होतें. हें धरण पुन्हां बांधण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी १·२ कोटी रुपये लागतील. नागार्जुन सागर योजनेचा खर्च ८६·५७ कोटी रु. अंदाजण्यांत आला होता. पण आतां ६·७ कोटी रु. अधिक लागणार आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

नामदार बाळासाहेब देसाई यांची विद्याभवनास भेट—दिनांक १६ रोजीं दुपारीं येथील पुणें सेंट्रल को—ऑप. बँकेचे चेअरमन श्री. यशवंतराव बाजीराव ऊर्फ दादासाहेब सावंत, इनामदार, यांच्या ‘ विद्याभवन ’ वसतिगृहास बांधकाममंत्री ना. बाळासाहेब देसाई यांनीं भेट दिली. संस्थेच्या कामकाजाबद्दल नामदारांनीं समाधान व्यक्त केलें. याप्रसंगीं श्री. सावंत इनामदार यांनीं दिलेल्या मेजवानीस श्री. बापूसाहेब सणस, सणसर येथील वाचकबंधू, इत्यादि प्रतिष्ठित मंडळी हजर होती.

---

**लोकसंख्येंतील बदलावर नजर**—भारत सरकारनें दरसाल मार्च व एप्रिल महिन्यांत लोकसंख्येची नमुना—पद्धतीनें पहाणी करण्याचें ठरविलें आहे. लोकसंख्येंत होणारी वाढ आणि लोकांचें स्थलांतर ह्याविषयीं माहिती जमविण्याचा उद्देश ह्या उपक्रमामागें आहे. त्यामुळें माहितीहि अद्यावत् मिळेल अशी अपेक्षा आहे.

**पुस्तकांवरील विक्रीकर रद्द**—पश्चिम बंगाल सरकारनें पुस्तकें व नियतकालिकें ह्यांच्यावरील विक्रीकर रद्द केला आहे. मुंबई, मद्रास व इतर कांहीं राज्यांत पुस्तकांच्या विक्रीवर कर नसल्यामुळें कलकत्त्यामधील पुस्तक—प्रकाशकांना स्पर्धा करणें कठीण जात होतें. शिवाय, विद्यार्थ्यांनाहि पुस्तकें विकत घेणें अडचणीचें होत होतें. म्हणून कर रद्द करण्यांत आला.

**नर्मदेवर नवा पूल**—भारतामधील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक नर्मदेवरील ओंकारेश्वर हें आहे. ह्या पवित्र ठिकाणीं लाखों यात्रेकरू दरवर्षी जातात. पण पावसाळ्यांत नर्मदेला पाणी चढल्यावर भाविकांना ओंकारेश्वराला जातां येत नाहीं. ही अडचण दूर करण्यासाठी तेथें नर्मदा ओलांडण्यासाठी एक नवा पूल बांधण्यांत येणार आहे.

**आर्थिक मदतीबाबत दृष्टिकोन**—अमेरिकन सरकारचे अर्थतज्ज्ञ मि. डिलॉन ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं १९५८ अखेरपर्यंत रशिआकडून भारताला ३०·४ कोटी डॉलर्सची मदत झाली आहे. रशिआकडून भारताला मिळणाऱ्या मदतीमुळें भारतावर फार कडक बंधनें पडत नसतील तर अशा मदतीचें अमेरिका स्वागतच करील, असें ते म्हणाले.

**दरवर्षी ५०,००० नवे कॉलेज विद्यार्थी**—विद्यापीठ अनुदान मंडळाचे चिटणीस मि. सॅम्युअल मथाय ह्यांनीं विद्यापीठांत शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येंत होत असलेल्या भरमसाठ वाढीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. उच्च शिक्षणाला लायक नसणारे अनेक विद्यार्थी ह्या संख्येंत असतात असें त्यांचें म्हणणें आहे. दरसाल विद्यापीठांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५०,००० नीं वाढत आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**रेल्वे वॅगन्सचा अपुरा पुरवठा**—खाराघोडा आणि पालडी ह्या रेल्वे स्टेशनांवर मिठाच्या ६०,००० गोणी, वॅगन्सचा अपुरा पुरवठा असल्यामुळें, पडून आहेत. त्यामुळें उत्तर भारतांत मिठाची वहातूक करण्याचें काम थंड पडलें आहे. मिठागराकडून आणखी मीठ येत असल्यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली आहे. सौराष्ट्रामधील मिठागरांची त्यामुळें पंचाईत झाली आहे.

**खंबायत—मुंबई रेल्वेमार्ग**—खंबायतपासून मुंबईपर्यंत रुंद रुळाचा रेल्वेमार्ग बांधण्याचा विचार करण्यांत येत आहे. खंबायतमध्यें व्यापारी प्रमाणावर तेल सांपडण्याची शक्यता लक्षांत घेऊन हा उपक्रम केला जात आहे. तेल सांपडलें तर त्याच्या वहातुकीची सोय करावीच लागेल.

★ होतकरू संसारी तरुण—तरुणींसाठी ★
श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज
कण आणि क्षण रु. २=५०
पुढे पाऊल रु. २=००
तुमचें स्थान कोणतें ? रु. २=००
ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन
तुमचें शुभचिंतन प्रभावी करा !
—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : —श्री. वा. काळे, संपादक, “ अर्थ ”
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.




सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिटा यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा :— फोर्ट · दादर · माहिम · परळी · पुणें · चेळगांव.
महिला शाखा :— सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. २५ मार्च, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांना नफा कमी कां झाला ?

### कर्जास मागणी नसतांना, भारी व्याजानें ठेवी घेतल्या.

१९५८ सालीं, हिंदी बँकांनीं ज्यास्त दरानें ठेवी घेतल्या पण त्यांचा कर्जासाठी किफायतशीर उपयोग करणें त्यांना शक्य झालें नाहीं आणि त्यांची रक्कम सरकारी रोख्यांत गुंतवावी लागली; त्याकारणानें बँकांच्या नफ्यावर प्रतिकूल परिणाम झाला. १७ मोठ्या हिंदी बँकांच्या उपलब्ध हिशेबावरून असें दिसून येतें, त्यांना १९५७ च्या मानानें १९५८ मध्यें ६० लक्ष रुपये कमी नफा झाला; १९५७ मध्यें तो १९५६ च्या मानानें ९१ लक्ष रुपये ज्यास्त झाला होता. अमेरिकन सरकारच्या खास ठेवी सोडल्या, तर बाकीच्या ठेवींची वाढ बँकांनीं व्याजाच्या बाबतींत स्पर्धा करूनच घडवून आणली. त्यामुळें व्याजाचा बोजा वाढला. औद्योगिक उपक्रमांच्या उभारणींत पडलेला खंड, आयातीवरील कडक निर्बंध, इत्यादि कारणांमुळें कर्जमागणी पूर्वीसारखी राहिली नाहीं. १९५८ मध्यें ती फक्त १९ कोटी रुपयांनीं वाढली; १९५७ मध्यें १३० कोटी रुपयांनीं व १९५६ मध्यें १४२ कोटी रुपयांनीं ती वाढली होती.

ह्याचा परिणाम असा झाला, कीं बँकांना भारी दरानें जमविलेला पैसा कमी व्याजाच्या सरकारी रोख्यांत गुंतवावा लागला; १९५७ च्या मानानें १९५८ मध्यें ही गुंतवणूक १५३ कोटी रुपयांनीं वाढली. पैसा उभारण्यासाठीं द्यावें लागणारें सरासरी व्याज, आणि कर्जावर मिळणारें सरासरी व्याज, ह्यांमधील नफ्याचें प्रमाण सहाजीकच घटलें. १९५८ च्या प्रारंभींच बँकांनीं ही परिस्थिति ओळखून, ठेवीवरील व्याज कमी केलें असतें, तर नफ्यांत एवढी घट झाली नसती. तथापि, त्यांनीं व्याजाच्या दराची स्पर्धा ऑक्टोबर, १९५८ पर्यंत चालू ठेवली. तेव्हां मात्र बँकांनीं ठेवींवरील व्याजाबाबत करार करून बंधनें खुषीनें पत्करलीं. पण त्यावेळीं, ठेवींसाठी स्पर्धा कमी होऊन व्याज उतरण्याच्या बेतांतच होते; ह्या कराराची कसोटी येत्या कांहीं महिन्यांत लागेल. कारण, मोसमी कर्जांना मागणी वाढल्यावर ठेवीवरील व्याजाचे दर पुनः चढीचे रहाण्याचा संभव आहे.

---

## वर्णभेदावर दारूबंदीचा उपाय !

प. बंगालमधील ज्या क्लबांत वर्णभेद केला जातो, अशा क्लबांना दारूचा परवाना पुढील वर्षी, ( ३१ मार्चनंतर ) दिला जाणार नाहीं, असें प. बंगाल सरकारनें जाहीर केलें आहे. हें सर्व क्लब कलकत्ता येथेंच असून त्यांत कलकत्ता स्विमिंग क्लब, दि सॅटरडे क्लब, दि कलकत्ता फुटबॉल क्लब, दि टॉलीगंज क्लब, दि बेंगाल क्लब, दि कलकत्ता क्रिकेट क्लब आणि दि बेंगाल रोइंग क्लब, ह्यांचा समावेश आहे. हे सर्व क्लब आपलें धोरण बदलतील अशी सरकारला आशा आहे. वर्णभेदावरील हा उपाय यशस्वी व्हावा; कारण दारूखेरीज श्वेतवर्णीयांचें कसें चालणार ? पण ह्या उपायामुळें, हिंदी श्रीमंत लोकांची दारू पिण्याची शानदार सोय होणार आहे, हेंहि खरें आहे.

## हौशी प्रवाशांच्या धंद्याचें वाढतें महत्त्व

हौशी-प्रवासी संघटनांच्या आंतरराष्ट्रीय संघाचे अध्यक्ष मि. बर्नेकर हे पूर्व आशिआचा दौरा करून भारतांत आले आहेत. हौशी प्रवाशांच्या धंद्यापासून देशाला कसा फायदा होतो तें त्यांनीं ऑस्ट्रिआच्या उदाहरणावरून दाखवून दिलें. पत्रकारांशीं ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं गेल्या वर्षी ऑस्ट्रिआला आपल्या परदेशी व्यापारांत प्रतिकूल तफावतीला तोंड द्यावें लागलें. परदेशी प्रवाशांना ऑस्ट्रिआंत प्रवास करण्यास उत्तेजन देऊन ऑस्ट्रिआनें १७·९ कोटी डॉलर्स मिळविले आणि तफावतीचा खड्डा भरून काढला. ह्यावरून ह्या धंद्याचें जगभर वाढत असलेलें महत्त्व लक्षांत येतें. ऑस्ट्रिआमध्यें १९५२ सालीं ह्या धंद्यांचें स्थान ८ व्या क्रमांकाचें होतें. देशाच्या अर्थव्यवस्थेंत लोखंडाच्या व पोलादाच्या धंद्याचें स्थान पहिलें होतें. पण आतां हें स्थान हौशी प्रवाशांच्या धंद्यानें पटकाविलें आहे. आज युरोपमध्यें प्रवास करणाऱ्यांमध्यें ८० टक्के लोक युरोपिअन्स आहेत. त्यांनीं आतां युरोप बराच पाहिला आहे. आतां नवीन देश पाहण्याची त्यांची फार इच्छा आहे. युरोपमध्यें हौशी प्रवाशांची संख्या दरसाल १५ टक्क्यांनीं वाढत आहे. भारतांत प्रवाशांना आकर्षक वाटण्यासारखी पुष्कळ ठिकाणें आहेत. पश्चिम आशिआंतील व आफ्रिकेंतील अस्थिर परिस्थिति लक्षांत घेतां भारताला ह्या संधीचा फायदा घेतां येणें सुलभ आहे. भारतामधील हॉटेल्स व प्रवाशांना देण्यांत येणाऱ्या इतर सवलती ह्यांचे दर युरोपमधील हॉटेल्स सारखेच आहेत भारतामधील चांगल्या दर्जाचीं हॉटेल्स जपानमधील चांगल्या हॉटेल्सच्या बरोबरीचीं आहेत. युरोपिअन प्रवाशांपेक्षा अमेरिकन प्रवासी सरासरी २॥ पट अधिक खर्च करतो असें संशोधनांत आढळून आलें आहे.

---

## मुंबईमध्यें आणखी एका डेअरीची स्थापना

युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स फंडाची ( Unicef ) बैठक जिनीव्हा येथें नुकतीच भरली होती. त्या बैठकींत मुंबई सरकारला दुसऱ्या एका डेअरीसाठी १० लक्ष डॉलर्स देण्याचा निर्णय घेण्यांत आला. ह्या देणगीची एक अट अशी आहे, कीं डेअरी सुरू झाल्यानंतर पहिलीं पांच वर्षे शाळकरी मुलांना मोफत किंवा सवलतीच्या दरानें ७५ लक्ष रुपयांचें दूध पुरवण्यांत आलें पाहिजे. डेअरी उभारण्यासाठी भारत सरकारला आतां न्यूझीलंड सरकारकडे ५ लक्ष डॉलर्सची देणगी मागावी लागेल. येत्या दोन-तीन महिन्यांतच वरळी येथें डेअरी उभारण्याचें काम सुरू होईल आणि १९६० अखेर डेअरी दूध पुरवूं लागेल. फंडानें आतांपर्यंत वेगवेगळ्या देशांत १८० दूध-योजनांना मदत केली आहे. पण मुंबईच्या डेअरी-योजनेइतकी मोठी मदत कोणत्याहि योजनेला मिळालेली नाहीं.

## प्रत्येक भारतीयानें दररोज १ पेला चहा घेतला तरी—

भारतांतील प्रत्येक नागरिक दररोज एक पेला जरी चहा प्याला, तरी हिंदी चहाच्या धंद्यापुढील अडचणी दूर होतील, असें इंडियन टी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एल. टी. कारमायकेल, हे नुकतेच म्हणाले. भारतांतील चहाचा खप दरवर्षी वाढत आहे; पण सध्याची चहापानाची सरासरी दर माणशीं दर तीन दिवसांनीं एक पेला, एवढीच आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें प्रत्येकजण दररोज सरासरीनें आठ पेले चहा पितो. चहाच्या दर्जापेक्षा चहाच्या मळ्यांच्या नफ्यावर कर-आकारणी केली, तर भारताला चहा निर्गत करून परदेशी हुंडणावळ मिळविणें सोपें जाईल, असेंहि ते म्हणाले. भारतांत विकल्या जाणाऱ्या चहांत भेसळ असते, हें त्यांनीं मान्य केलें; मळ्यांत वाया जाणाऱ्या पत्तीचा नाश सक्तीनें केला जाणें, हाच भेसळीवर प्रभावी उपाय आहे. भारतांतून ब्रिटिश भांडवल काढलें जात नसून उलट नवें नवें भांडवल येथें गुंतविण्यांत येत आहे; पण चहाच्या धंद्यांतून मात्र तें काढून घेतलें जात आहे. ग्रेट ब्रिटनच्या भांडवलास हिन्दी चहाच्या धंद्यांत वाव राहूं दिला तर ग्रेट ब्रिटनची चहाची बाजारपेठ भारताच्या हातची जाणार नाहीं, अशी त्यांनीं सूचना केली.

## डेक्कन मर्चंटस को. बँकेचा कारभार

डेक्कन मर्चंटस को. बँक बंद पडल्यामुळें ६,४७० ठेवीदारांचे २५,३७,७२० रु. अडकून पडले आहेत. बँकेच्या बायलॉला संमत नसलेली विना-तारण कर्जें कित्येकांना देण्यांत आलीं, अशी तक्रार आहे. बँक 'अ' वर्गाची असल्याकारणानें, तिनें बँकेचें ऑडिट करण्याची पात्रता असलेल्याला ऑडिटर नेमलें होतें. बँकेनें ऑडिटची केलेली व्यवस्था असमाधानकारक आहे, असें चौकशीअंतीं सिद्ध झाल्याखेरीज बँकेचें फेरऑडिट करण्यास लावणें शक्य नव्हतें. बँकेच्या ऑडिटराच्या रिपोर्टांत गैरवाजवी प्रकार दिसून आलेले नव्हते. म्हणून, रजिस्ट्रारनें टेस्ट ऑडिट १९५६-५७ साठी करण्याचें व १९५७-५८ चें वार्षिक ऑडिट करण्याचें ठरवून त्यासाठी स्पेशल ऑडिटरची नेमणूक केली. स्पेशल ऑडिट करवलें तर ठेवीदारांत घबराट होईल, असें बँकेचें म्हणणें होतें. म्हणून, स्पेशल ऑडिटरला १९५७-५८ चेंच फक्त ऑडिट करण्यास सांगितलें, आणि त्या वर्षाकरितां सर्टिफाइड ऑडिटर नेहमीप्रमाणें नेमूं नका असें बँकेस कळविण्यांत आलें. कारण, तें ऑडिट सरकारी ऑडिटरकडे सोंपविण्यांत आलें होतें.

## आंबराई लावणाऱ्यांना बक्षिसें

१९५८ मध्यें भरलेल्या मुंबई राज्य आंबराई स्पर्धेत खालील इसमांना बक्षिसें देण्यांत आलीं आहेत.

पहिलें बक्षिस ५०० रुपये, श्री. मगनलाल लालभाई देसाई, ललितापूर, सुरत जिल्हा.

दुसरें बक्षिस ३०० रुपये, श्री. श्रीराम मोरेश्वर गोगटे, देवगड, जिल्हा रत्नागिरी.

तिसरें बक्षिस २०० रुपये, श्री. धनजीभाई कानजीभाई वाघेला, सरासिआ, जि. अमरेली.

मुंबई सरकारनें वरील व्यक्तींचीं नांवें अखिल भारतीय स्पर्धेकरितां उमेदवार म्हणून जाहीर करण्याकरितां भारतीय कृषि संशोधन मंडळाला कळविलीं आहेत.

राज्यांतील निरनिराळ्या जातींच्या आंब्याच्या सर्वोत्कृष्ट संग्रहाबद्दल श्रीमती पिरोजा विकाजी गिलाडवाला पारडी, जि. सुरत, यांना सरकारनें ३०० रुपयांचें रोख बक्षिस दिलें आहे.

## मध्यवर्ती बँकांच्या प्रमुखांची शिक्षण संघटना

कॉमनवेल्थ बँक ऑफ ऑस्ट्रेलिया, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, रिझर्व्ह बँक ऑफ न्यूझीलंड आणि स्टेट बँक ऑफ पाकिस्तान ह्यांचे गव्हर्नर्स व सेंट्रल बँक ऑफ सिलोन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ह्यांचे डेप्युटी गव्हर्नर्स, ह्यांची दिल्ली येथें नुकतीच बैठक झाली. साउथ ईस्ट एशिया, न्यूझीलंड ऑस्ट्रेलिया सेंट्रल बँकिंग कोर्स (SEANZA) च्या कौन्सिल ऑफ गव्हर्नर्सची ती बैठक होती. सप्टेंबर तें नोव्हेंबर १९५८ ह्या कोर्सचें पहिलें अधिवेशन ऑस्ट्रेलियांत झालें, त्याचा प्रस्तुत बैठकींत आढावा घेण्यांत आला. मध्यवर्ती बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय ह्या कोर्सनें केलेली आहे. दुसऱ्या कोर्ससाठी १४ देशांतील १८ अधिकारी उपस्थित होते. शिक्षण देण्याचें काम कोर्सच्या पांच संस्थापक देशांतील तज्ज्ञांनीं केलें. जागतिक बँक व मोनेटरी फंड ह्यांच्या अधिकाऱ्यांनींहि मार्गदर्शन केलें. ह्यानंतरचा कोर्स मुंबई येथें भरविला जाईल. दिल्ली येथील बैठकींत विचारविनिमयासाठी बँक ऑफ इंग्लंडचा गव्हर्नर बोलावला होता.

## चोरीच्या रकमेचा बँकेला ड्राफ्टनें भरणा

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जामनगर शाखेंतील एकाच्या सेव्हिंग्ज खात्यांतून कोणीतरी ८,००० रु. खोट्या सह्या करून काढले, पण कांहीं दिवसांनीं बँकेच्या शाखा-अधिकाऱ्याच्या नांवानें ध्रोळ (हलार जिल्हा) येथील सहकारी बँकेवरील त्या रकमेचे ड्राफ्ट आले! ज्या सेव्हिंग्ज खात्यांतून ८,००० रु. खोटेपणानें काढण्यांत आले होते, त्यांत ड्राफ्टचे पैसे भरण्याविषयीं शाखा-अधिकाऱ्याला सूचना देण्यांत आली! काउंटर फॉईल आणि पैसे काढण्याच्या स्लिपा बँकेच्या रेकॉर्डमधून लांबविण्यांत आल्या आहेत, असें पोलिस तपासांत आढळून आलें.


...प्रगतीचा नवीन टप्पा...

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

सावधानतेच्या धोरणांतील
यशाचे बोलके आंकडे

★ बँकेकडील ठेवींत गत वर्षी २ कोटी, ७० लक्ष रु. नी वाढ होऊन १९५८ अखेर बँकेकडील ठेवी १० कोटी, ५६ लक्ष रु. झाल्या.

★ ६ कोटी, ८० लक्ष रु. एवढी रक्कम रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक रोखे इत्यादींत गुंतवणूक व रोकड यांत आहे. बँकेच्या आर्थिक मजबुतींत यामुळें भर पडली.

★ कर्जाऊ दिलेल्या रकमांचें ठेवींशीं प्रमाण सुमारें ४० टक्के पडलें.

★ बँकेच्या वसूल भांडवलांत रु. ६,१५,००० ची वाढ झाली.

★ गंगाजळी तेरा लाख रु. पर्यंत गेली.

★ बँकेस ५ लक्ष, ५६ हजारांचा नफा होऊन तिनें साडेसहा टक्के करमाफ डिव्हिडंड जाहीर केलें.

महाराष्ट्र बँकेपुढील विविध योजनांत
आपण सहभागी व्हा.

हेड ऑफिस : बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर

## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि., बेळगांवला ३१-१२-१९५८ अखेर संपलेल्या वर्षी १,३५,१९५ रु. नफा झाला, त्यांत शिलकी नफा मिळविला म्हणजे नफा वांटणीस १,३७,५१६ रु. येतात. त्याची वांटणी खालीलप्रमाणें केली जाईलः—

| | रु. |
|---|---|
| ५% डिव्हिडंड + २½% बोनस, करमाफ | ४५,००० |
| रिझर्व्ह फंड | २८,००० |
| इन्कम टॅक्सची तरतूद | ५५,००० |
| बॅड डेट रिझर्व्ह | ३,००० |
| इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड | ३,००० |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठी | ३,५१६ |
| | १,३७,५१६ |

अहवालाच्या वर्षी बँकेकडील ठेवींत बरीच मोठी भर पडली. नोव्हेंबर, १९५८ मध्यें तर ठेवींची रक्कम १,४७,२७,००० रु. झाली होती. सरकारी रोख्यांतील गुंतवणूकहि वाढली आहे. कागवाड येथें बँकेची नवी शाखा—२६ वी शाखा—डिसेंबर, १९५८ मध्यें सुरू करण्यांत आली. आधुनिक पद्धतीच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय असलेली नवी इमारत निपाणी येथें श्री. देवचंद शहा हे मुद्दाम बांधीत आहेत, त्यांत निपाणी शाखा लवकरच स्थलांतर करील. बँकेच्या मुख्य कचेरीचें व शाखांचें ऑडिट वेगवेगळ्या ऑडिटरांनीं स्वतंत्रपणें केलें आहे, हें वैशिष्ट्य मुद्दाम उल्लेखनीय आहे.

## अखिल भारतीय शेतकरी परिषद

येत्या मे महिन्याच्या १ ते ५ तारखेपर्यंत म्हैसूर येथें भरणाऱ्या अखिल भारतीय शेतकरी परिषदेच्या पांचव्या अधिवेशनाकरितां मुंबई राज्यांतून सुमारें २,००० शेतकरी जातील असा अंदाज आहे. ही परिषद भारत कृषि समाजाच्या विद्यमानें भरविण्यांत येत असून तींत शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध समस्यांसंबंधीं विचारविनिमय करण्यांत येईल. याप्रसंगीं तेथें एक शेतकी व ग्रामोद्योग प्रदर्शनहि भरविण्यांत येणार आहे. या प्रदर्शनांत निरनिराळ्या राज्यांतील शेतकी विभाग व इतर संस्था भाग घेणार आहेत. देशांतील कृषिशास्त्रविषयक यथार्थ प्रगतीचें दर्शन या प्रदर्शनांत घडविण्यांत येणार आहे.

## विदेशी फर्म्समधील हिंदीकरण

भारतांतील विदेशी फर्म्समधील दरमहा १,००० रु. पगारावरील जागांचें हिंदीकरण समाधानकारक गतीनें होत आहे. १९५८ मध्यें, अशा जागांवर ६,७०४ हिंदी लोक होते; १९५२ मध्यें त्यांची संख्या फक्त २,२९० होती. ह्याच मुदतीमध्यें, विदेशी फर्म्समधील विदेशीयांची संख्या ७,१०४ वरून ५,६५२ वर उतरली आहे. १,००० रुपयांखालील जागांवर सर्वजण हिंदीच आहेत. मळ्यांवरील अधिकाऱ्यांत विदेशीयांचें प्रमाण अजूनहि मोठें आहे.

## दि बेळगांव बँक लि. ची प्रगति

प्रगतीचा तक्ता

( गेलीं २९ वर्षे बँकेनें किमान ६¼% डिव्हिडंड कायम राखले आहे. )

| | १९५२ | १९५४ | १९५६ | १९५८ |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ६,००,००० | ६,००,०९० | ६,००,००० | ६,००,००० |
| रिझर्व्हज | १,७६,९०८ | २,१९,९२६ | २,६३,८९० | ३,२७,३४३ |
| ठेवी | ७५,०७,६१९ | ९५,४५,७७२ | १,११,४०,१२६ | १,३८,९६,९७५ |
| कर्जें | ३७,१२,३६३ | ३९,१३,३७९ | ५३,४८,२८४ | ६१९९,०१० |
| खेळतें भांडवल | ९२,९३,५०८ | १,१७,०५,१०९ | १,४१,७६,१०६ | १,७५,७२,८७९ |
| नफा | ६५,५८५ | ८३,३६९ | ७९,००६ | १,३५,१९६ |
| डिव्हिडंड | ६¼% | ५% + १¼% बोनस | ५% + १¼% बोनस | ५% + २½% बोनस |

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

जाहीर करण्यास आनंद होतो कीं

—आजपावेतों—

चालू हंगामाचें साखरेचें उत्पादन

★ दीड लक्ष पोत्यांहून जास्त झालें असून ★

—हंगाम जोरांत चालू आहे.—

के. त्र्यं. चांफेकर, बी. ई., ए. एम्. आय्. ई., मॅनेजर.

शं. ल. लिमये, बी. एस्सी., एलएल्. बी. अध्यक्ष.

## मुंबई-पुणें व मुंबई-आग्रा रोड वरील अपघात

### मुंबई-पुणें रस्ता

| वर्ष | अपघाती मृत्यू | गंभीर जखमा | किरकोळ | माणसांना जखमा नाहींत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९५५ | ८ | १६ | ९२ | ७७ | १९३ |
| १९५६ | १७ | १३ | १०६ | १०८ | २४४ |
| १९५७ | १३ | ७ | १२२ | १९० | ३३२ |
| १९५८ | ४२ | १६ | १५२ | २६५ | ४७५ |
| | | | मुंबई-आग्रा रस्ता | | |
| १९५५ | २१ | १५ | ८३ | १२४ | २४३ |
| १९५६ | ३४ | १७ | ९१ | १०९ | २५१ |
| १९५७ | २७ | २० | ९४ | ११८ | २५९ |
| १९५८ | ३३ | २४ | १०८ | २०७ | ३७२ |

ह्या दोन रस्त्यांवरील अपघातांत झालेल्या वाढीचें मुख्य कारण, त्यावरील वहातुकींत झालेली मोठी वाढ, हेंच आहे.

३१ मार्च, १९५७ रोजीं सबंध मुंबई राज्यांत ११,७४९ मोटार सायकली, ९१७ ऑटोरिक्षा, २,७२४ जीप्स, ५४,२९८ खासगी मोटारी, ५,२४९ टॅक्सी, २,७९९ बसेस, २७,४११ मालाच्या लॉऱ्या आणि ४,९११ इतर वहानें मिळून एकूण १,०९,७३० वहानें होतीं. १९५८ च्या प्रारंभीं त्यांची एकूण संख्या १,४४,७०१ झाली.

### मुंबई-पुणें व मुंबई आग्रा रोडवर दररोज धांवणाऱ्या लॉऱ्यांची संख्या

| | मुंबई पुणें रस्ता | मुंबई-आग्रा रस्ता |
|---|---|---|
| फेब्रुवारी १९५८ | ३४६ | ६३७ |
| नोव्हेंबर १९५८ | ८७३ | ८२९ |
| जानेवारी १९५९ | ८५६ | ८८१ |

१९५८ मध्यें प्रत्येक ७०.०५ सेकंदांना एक लॉरी मुंबई-पुणें रस्त्यावर धांवत होती; आणि प्रत्येक ५०.६० सेकंदांना एक लॉरी मुंबई-आग्रा रोडवर धांवत होती. याचा अर्थ, प्रत्येक २०.८१ सेकंदांना एक लॉरी मुंबई आणि ठाणें ह्यांच्यामध्यें धांवत होती. हे आंकडे फक्त लॉऱ्यांचेच आहेत; खासगी मोटारी व इतर वाहनें ह्यांची पडणारी भर विचारांत घेतली, तर वहातुकीची गति अधिकच असलेली दिसेल.

---

## लेड-ॲसिड स्टोअरेज बॅटऱ्यांसाठी प्रमाणकाचा मसुदा

मोटार गाड्यांत वापरण्यांत येणाऱ्या लेड-ॲसिड स्टाअरेज बॅटऱ्यांसाठी दि इंडियन् स्टॅण्डर्ड्स् इन्स्टिटयूशननें भारतीय प्रमाणकाचा एक मसुदा प्रसृत केला आहे.

हा मसुदा म्हणजे अशा लेड-ॲसिड स्टोअरेज बॅटऱ्यांसाठी वापरण्यांत येत असलेल्या वुडन सेपरेटरकरितां पूर्वी प्रसृत केलेल्या भारतीय प्रमाणकाची ( आय. एस. ६२५–१९५५ ) सुधारलेली आवृत्ति होय.

या बॅटऱ्या आतां अधिक चांगलें काम देणाऱ्या, अधिक विद्युत्शक्तीच्या व कमी वजनाच्या बनवितां येत असल्यानें सेपरेटरकरितां प्रसृत करण्यांत आलेल्या प्रमाणकाच्या मसुद्याचा फेरविचार करणें आवश्यक झालें. बॅटऱ्यांच्या उत्पादनाइतकेंच सेपरेटरांचेंहि उत्पादन व्हावें आणि त्याजबरोबर याप्रमाणें जुन्या मसुद्यांत बदल करतां यावा, या उद्देशानें उपरोक्त मसुदा प्रसृत करण्यांत येत आहे.

## इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.,

### ३१–१२–५८ रोजींच्या १,२६,८५,६६४ रुपयांच्या इन्व्हेस्टमेंटची वर्गवारी

| | | |
|---|---|---|
| बँका | ७.१८ | % |
| सिमेंट | ४.५२ | " |
| केमिकल्स | १.७० | " |
| कोळसा | १.२७ | " |
| कपास व रेशीम | १३.०० | " |
| वीज व ट्राम | ९.१५ | " |
| विमा | २.१७ | " |
| लोखंड व पोलाद | ५.६२ | " |
| ताग | ८.९८ | " |
| खाणी | २.३० | " |
| किरकोळ | २३.३१ | " |
| कागद | २.०९ | " |
| रबर | ०.५६ | " |
| मीठ | १.४४ | " |
| शिपिंग | १.३१ | " |
| साखर | ९.९७ | " |
| चहा | ३.०९ | " |
| टेलिफोन्स | ०.०२ | " |
| सरकारी रोखे | २.३२ | " |
| | १००.०० | |

### रोख्यांपैकी ब्रिटिश व रुपयाच्या चलनांतील रोखे

| | | % |
|---|---|---|
| रुपयाच्या चलनांतील | ९५.११ | " |
| स्टर्लिंग चलनांतील | ४.८९ | " |
| | १००.०० | |

### रोख्यांचा प्रकार

| | | |
|---|---|---|
| सरकारी रोखे व डिबेंचर्स | ४.४७ | % |
| प्रेफरन्स भाग | १५.६२ | " |
| ऑर्डिनरी भाग व स्टॉक | ७९.९१ | " |
| | १००.०० | |

---

## दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहारांत निव्वळ नफा रु- २८,५९६ झाल्याचें दिसून येईल. यांत गतवर्षीचा शिलकी नफा रु. ३,२६३ मिळविला असतां एकूण रक्कम रु. ३१,८६० ही विभागणीसाठी उपलब्ध होते. या रकमेची वाटणी खालील प्रमाणें करावी अशी संचालकांची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडांत जमा करण्यासाठी ( बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ चें कलम १७ अन्वयें ) रु. ७,०००, कर्जरोख्यावरील घसारा फंडासाठी रु. ५०००, कंटिन्जन्सी फंडासाठी रु. १,०००, ६% क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडंड देण्यासाठी रु. १,२२५, शिल्लक पुढील वर्षासाठी ( त्यांतून कर द्यावयाचा ) रु. १७,६३५ = एकूण रु. ३१,८६० अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले असून बँकेकडे असणाऱ्या ठेवींमध्यें रु. सात लाखांचे वर वाढ झाल्याचें दिसून येईल. बँकेच्या शाखांचें कामकाजहि समाधानकारक होत आहे.

## परकीय चलन मिळवून देणारा भारतांतील हाडांचा सांठा

भारत हा हाडांच्या सांठ्याच्या बाबतींत एक संपन्न देश असून भारतांत दरवर्षी ७ कोटी रुपये किंमतीचीं ३·६ लक्ष टन हाडें उपलब्ध होतात, असें मध्यवर्ती अन्न आणि शेतकी खात्याच्या 'बाजारपेठ आणि तपासणी विभागाच्या' भारतांतील हाडें आणि हाडांची भुकटी बाजारपेठविषयक अहवालांत म्हटलें आहे.

हाडांची उपलब्धता, तीं गोळा करणें, त्यांचा व्यापार व निर्यात, यांसारख्या हाड-उद्योगधंद्यांच्या विविध बाजूंचा या अहवालांत ऊहापोह करण्यांत आला आहे. सध्यां १·३६ लक्ष टन म्हणजे अंदाजी सांठ्याच्या सुमारें ⅓ हाडें प्रत्यक्षांत गोळा करण्यांत येतात व पद्धतशीर प्रयत्नांच्या अभावीं बाकीचीं हाडें फुकट जातात, असेंहि या अहवालांत म्हटलें आहे.

हाडांचें उत्पादन होणारीं प्रमुख राज्यें पुढीलप्रमाणें:—उत्तर प्रदेश (१५·४ टक्के), मध्यप्रदेश (१२ टक्के), मुंबई (१०·३ टक्के), आंध्र प्रदेश (९·८ टक्के), राजस्थान (९·३ टक्के), बिहार (८·९ टक्के), पंजाब (८·३ टक्के), मद्रास (५·८ टक्के) आणि पश्चिम बंगाल (५·४ टक्के).

भारतांत गाई-म्हशी, घोडे, तट्टें, उंट, यांसारख्या मोठ्या जनावरांचीं हाडें गोळा करण्यांत येतात व यांपैकी बहुतेक हाडें मेलेल्या गुरांचीं असतात.

### उत्कृष्ट खत

फॉस्फेट-युक्त खतें मिळण्याचें हाड हें एक प्रमुख साधन असून देशांतील हाडांची भुकटी करणाऱ्या कारखान्यांत १·३५ लक्ष टन हाडांपासून हाडांची भुकटी, चुरा, हाडांतील चरबी, यांचे उत्पादन करण्यांत येतें. कुटीरोद्योगांत बसविण्यांत आलेल्या बोन-डायजेस्टरमध्यें हाडांची भुकटी व चुरा केला जातो व त्याखेरीज कंगवे, बटणें, पेपर कटर्स, खेळणीं इ. तयार करण्यासाठी कुटीरोद्योगांना २५० टन हाडें लागतात.

हाडांची भुकटी व हाडें यांच्या निर्यातीस बंदी असली तरी, हाडांचा चुरा, अस्थिकूची व हाडांपासून मिळणारी चरबी यांचा चांगला व्यापार होतो. निर्यात करण्याजोगें सुमारें ७४,००० टन हाडांचे उपपदार्थ निरनिराळ्या देशांकडे निर्यात होतात, व त्यापासून २·५ कोटी रुपये किंमतीचें परकीय चलन मिळतें.

धार्मिक समजुतीमुळें व महाग पडत असल्यानें देशाच्या कांहीं भागांत हाडांच्या खतांचा वापर करण्यांत येत नसला तरी केरळ, मद्रास, म्हैसूर, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि आसाम या राज्यांत तीं लोकप्रिय होत असल्याचें अहवालांत म्हटलें आहे. दक्षिण भारतांत तयार खत-मिश्रणांत हाडाच्या भुकटीचा एक घटक म्हणून वापर केला जातो.

हाडाची भुकटी अधिक लोकप्रिय करण्यासाठी व ती अधिक स्वस्त पडावी म्हणून प्रयत्न करण्यांत येत आहेत. तसेंच, हाडाच्या भुकटीचें उत्पादन व विक्री करण्यासाठी कांहीं राज्यांनीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी रकमा राखून ठेवल्या आहेत. हाडाच्या भुकटीच्या किरकोळ किंमतींत भारत सरकार आणि राज्य सरकारें २५ टक्के आर्थिक साह्य देतात.

### हाडें गोळा करण्यावर भर

हाड-उद्योगधंद्यापुढें असलेल्या विविध समस्यांचा उल्लेख करून या अहवालांत म्हटलें आहे कीं, ह्या धंद्याचा विकास होण्याच्या दृष्टीनें हाडें गोळा करण्याचें प्रमाण वाढलें पाहिजे; आणि अन्नधान्याप्रमाणें उत्पादन करून नव्हे तर मेलेल्या किंवा मारलेल्या जनावरांपासून हीं हाडें मिळवावयाचीं असल्यानें तर या गोष्टीवर अधिक भर देण्यांत आला पाहिजे.

समाज विकास योजना संघटना, ग्रामपंचायती, जनावरांची कातडीं सोलणारीं केंद्रें व नगरपालिका यांचा कच्चीं हाडें गोळा करण्यासाठी संपूर्णपणें उपयोग करून घेण्यांत यावा असें या अहवालांत सुचविण्यांत आलें आहे. तसेंच, हाडें जमविण्याचें प्राथमिक कार्य करणाऱ्याला अधिक चांगला दर देण्यांत यावा व समाज विकास योजना विभागांत खरेदी केंद्रें उघडण्यांत यावींत, अशीहि शिफारस करण्यांत आली आहे.

त्याचप्रमाणें, अधिक प्रमाणांत हाडें जमा करण्यासाठी देशाचे चार विभाग पाडण्यांत घेऊन अशा विभागांतील हाडांच्या अंतर्गत वाहतुकीवर बंदी घालण्यांत यावी, असेंहि सुचविण्यांत आलें आहे.

---

**फ्रेंच गिर्यारोहकांचें आगमन**—हिमालयांतील २५,००० फूट उंची असणाऱ्या एका शिखरावर आरोहण करण्यासाठी आठ फ्रेंच गिर्यारोहकांची एक तुकडी भारतांत आली आहे. मार्चच्या मध्यानंतर त्यांच्या आरोहणाला प्रारंभ होईल. तुकडींत एक डॉक्टर आणि एक भूस्तरशास्त्रज्ञ आहे. दोन फ्रेंच गिर्यारोहण संस्थांनीं मोहिमेचा खर्च सोसला आहे.

**अन्नधान्याची किंमत**—ओरिसा सरकारनें शेतकऱ्यांना त्यांच्या मालाच्या सरकारनें ठरवून दिलेल्या किंमती मिळण्यासाठी १९५५ सालच्या एसेन्शिअल कॉमोडिटीज ॲक्ट अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमती अन्नधान्याला देण्यांत आल्यास तो गुन्हा समजला जाईल व गुन्हेगार शिक्षेस पात्र होईल.

**सिंधु संस्कृतीचा विस्तार**—भारताच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचे माजी डायरेक्टर जनरल सर मार्टिमर व्हीलर ह्यांनीं सिंधु नदीच्या खोऱ्यांतील प्राचीन संस्कृतीवर बोलतांना असें सांगितलें कीं, ही संस्कृति सिंधूच्या खोऱ्यापुरतीच मर्यादित राहिली नव्हती. दक्षिणेकडे गुजरात व सौराष्ट्र ह्या भागापर्यंत तिचा विस्तार झालेला दिसून येतो.

**ब्रिटनकडून मिळणारी मदत**—१९५९-६० ह्या आर्थिक वर्षांत ब्रिटनकडून परदेशीय चलनाच्या स्वरूपांत मिळूं शकणारी मदत १॥ ते २ कोटी पौंडांपेक्षा अधिक असणार नाहीं, अशी वार्ता आहे. १९५९ ते १९६१ ह्या दोन आर्थिक वर्षांची मदतीची रकम एकदम ठरविण्यापेक्षा गरजेप्रमाणें वेगवेगळी ठरविण्यांत यावी, असें ब्रिटिश तज्ज्ञांचें मत आहे.

**नवीन एंजिनिअरिंग कॉलेजें**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अमलबजावणीसाठी तंत्रज्ञांचा सतत पुरवठा होणें अगत्याचें आहे. ह्या पुरवठ्यांत खंड पडूं नये म्हणून भारतांत येत्या दोन वर्षांत आणखी नऊ एंजिनिअरिंग कॉलेजें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्याशिवाय खालच्या श्रेणींतील तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यासाठी २७ विविधोद्योगी शाळाहि खोलण्यांत येणार आहेत.

**गिरणी ताब्यांत घेतली**—केरळ सरकारनें कालिकत येथील मलबार स्पिनिंग ॲंड वीव्हिंग मिल आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. आतां ही गिरणी लवकरच राज्य सरकारमार्फत चालविण्यांत येणार आहे. गिरणी कशा पद्धतीनें चालविण्यांत येईल त्याचा खुलासा करण्यांत आलेला नाहीं.

## पुण्यांतील व्यापारी उलाढाल

पुणें शहरांत लहानमोठे मिळून सुमारें १७५ विडींचे कारखाने असून दरवर्षी सुमारें एक कोटी रुपयांच्या विड्या शहरांतून बाहेर जातात. सौराष्ट्र, गुजराथ, महाराष्ट्र, म्हैसूर व सिलोनमध्यें विड्या पाठविल्या जातात.

दोन लाख रुपयांची तपकीर पुण्याबाहेर जाते.

पुण्यामध्यें केमिस्टचीं एकूण ८० दुकानें असून वर्षाला दीड कोटी रुपयांची औषधविक्री होते. त्यापैकी ३० लाख रुपयांचीं औषधें बाहेरगांवीं जातात.

बारा पेपर मिल्सचे सात एजंट पुण्यांत असून वर्षाला पुण्यांत सुमारें अडीच कोटी रुपयांच्या कागदाची विक्री होते. त्यांपैकी ६० लाख रुपयांचा कागद बाहेरगांवीं जातो.

पुण्यांतून साबुदाण्याची पंधरा हजार पोत्यांची निर्यात बाहेरगांवीं दरवर्षी होते. पुण्यांत २५ हजार पोतीं साबुदाणा दरवर्षी विकला जातो.

पुणें पेठेंत दररोज १,५०० डबे शेंगदाणा तेल खपतें. त्यांपैकी ८०० डबे बाहेरगांवीं जातात.

तांबे–पितळेच्या भांड्यांच्या व्यापाराचें पुणें हें भारतांतील प्रमुख ठिकाण असून दररोज शंभर दुकानांत दीड लाख रुपयांची उलाढाल होते. त्यापैकी पाऊण लाख रुपयांचा माल दररोज बाहेरगांवीं जातो. गदग, हुबळी, काशी, बनारसपर्यंत पुण्याचा माल जातो. पुण्यांत १५० कारखान्यांत तांबें-पितळेचीं भांडीं तयार होतात. सुमारें सहा हजार कामगार या व्यवसायांत गुंतलेले आहेत. पुण्यांत दरवर्षी साडेपांच कोटी रुपयांचीं तांबें-पितळेचीं भांडीं खपतात.

पुणें शहरांत दररोज २,५०० गुळाच्या ढेपा खपतात. त्यांपैकी दोन हजार ढेपा बाहेरगांवीं जातात. दरवर्षी गुळाच्या ९ लाख ढेपा पुण्यांत खपतात. यापैकी ७ लाख ढेपा बाहेरगांवीं जातात.

पुणें शहरांत वर्षाला सात लाख रुपयांच्या बांगड्या विकल्या जातात. त्यापैकी पांच लाख रुपयांचा माल बाहेरगांवीं जातो. उत्तर प्रदेशांतील फिरोजाबादहून बांगड्या येतात. बांगड्यावरील विक्रीकर मुंबई सरकारनें माफ केला आहे.

पुण्यांत वर्षाला ५ कोटी रुपयांची कापडविक्री होते. त्यापैकी दोन कोटी रुपयांचें कापड बाहेरगांवीं जातें. पुण्यांत दररोज एक लाख रुपयांचा कापड व्यापार होतो. लहान–मोठीं मिळून दोन हजार दुकानें आहेत.

पुण्यांत शंभर सायकल–व्यापारी असून सायकली व स्पेअर-पार्टस् मिळून साठ लाख रुपयांची विक्री होते. त्यापैकी चाळीस लाख रुपयांचा माल बाहेरगांवीं जातो. पुण्याहून फलटण, साखरवाडी, कोरेगांव बाजूला माल जातो. वर्षाला वीस हजार सायकली पुण्यास विकल्या जातात. सायकल हें पुणें शहरांतील प्रमुख वाहन आहे.

पुण्यांत दरवर्षी ८० हजार मण वाळलेली लाल मिरची खपते. त्याची किंमत अंदाजी साडेसहा लाख रु. होते. यापैकी पन्नास हजार मण मिरची बाहेरगांवीं निर्यात होते. मिरचीवर सेल्स् टॅक्स नाहीं. पुण्याचे आजूबाजूचे भागांत पुण्यांतूनच माल जातो.

—ग. कृ. भो.

( डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें, च्या त्रैमासिकांतून उद्धृत )


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाटी व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७३.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक ) (६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ६१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.